RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ४१(२)] शुक्रवार, नोव्हेंबर २८, २०२५/अग्रहायण ७, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**HOME DEPARTMENT,**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032.
dated the 28th November 2025.

*NOTIFICATION*

BHARATIYA NAGARIK SURAKSHA SANHITA THE STATE OF MAHARASHTRA eSAKSHYA MANAGEMENT RULES, 2025

No. BNSS/0325/C.R.34/ Special-09—In exercise of the powers conferred section 530 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following Rules : —

**1.** Short title and commencement.—

(1) These rules may be called the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita the State of Maharashtra eSakshya Management Rules, 2025.

(2) They shall come into force from the date of their publication in the official Gazette.

2. Definitions.—

(1) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "CCTNS" means Crime and Criminal Tracking Network and Systems, a system software used by the Police for the collection of data and execution of instructions ;

(*b*) "CIS" means Case Information System, a system software used by the District Judiciary and High Courts for the collection of data and execution of instructions;

(*c*) "eSign" means authentication of any electronic record by a subscriber or court, by means of the electronic technique specified in the Second Schedule of the Information Technology Act, 2000 (21 of 2000) and includes digital signature. Also, when a process or report generated in electronic form is authenticated by means of electronic signature, it shall be deemed to be authenticated by signature of the person who affixed the electronic signature.

(*d*) "High Court" means the High Court of Judicature at Bombay.

(*e*) "ICJS" shall mean Inter-operable Criminal Justice System, a software presently in operation for transfer of information among various pillars of criminal justice system, which includes investigating agencies, courts, correctional homes, forensic laboratories, prosecution; and any other stakeholder as notified by the central government.

(*f*) "Investigating Officer" means any police officer or any other person authorized by a competent authority or empowered to undertake investigation for any offence.

(*g*) "Sakshya" means any evidence collected/recorded as a document through eSakshya Mobile Application. Sakshya consists of video recording(s), photograph(s), photograph(s) of witness(s) and photograph of the investigating/recording officer. All evidence recorded through eSakshya Mobile Application shall generate a secure packet of the event (hereinafter referred to as "eSakshya Packet') with a unique ID called SID, a unique 16 digits ID (SID) with opening, closing time stamp and geo-location each and its contents will have unique hash value to ensure integrity, Sakshya will be stored in immutable storage.

(*h*) "Sanhita" means the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023).

(2) Words and expressions used, but not defined in these rules shall have the same meaning as assigned to them in the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023); the Bharatiya Nyaya Sanhita, 2023 (45 of 2023); the Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023, (47 of 2023) and the Information Technology Act, 2000 (21 of 2000).

3. Every Investigating Officer shall record all video and photo evidence as required under section 105,173,176,180, 185, and 497 of the Sanhita through the eSakshya Mobile Application.

4 Investigating Officer shall generate a certificate 63 (4) (c) Part A of the Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 (47 of 2023) through the eSakshya Mobile Application. All Certificates will be eSigned.

5. Investigating Officer shall link SID with the concerned FIR number/GD number generated through CCTNS.

6. The Sakshya uploaded to immutable storage shall be construed to be forwarded to Magistrate as required under section 105 and 185 of the Sanhita.

7. The courts can view and manage all Sakshya concerning to their jurisdiction in the CIS application/Sakshya portal on ICJS.

8. The court may permit sharing of Sakshya with accused and the victim (if represented by an advocate) as per the provisions under section 230 of the Sanhita.

9. eSakshya packet will be archived after completion of trial and will be moved to Archival mode.

10. Nothing in these rules shall be deemed to limit the power of the Courts to view the Sakshya by the Court.

11. These rules shall be in addition to, not in derogation of any other law or rules for time being in force for accepting and managing Sakshya by the Court in terms of the provisions of Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 (47 of 2023).

12. If any difficulty arises in giving effect to the provisions of this Rule, the Government of Maharashtra may, by order, published in the Official Gazette, make such provisions not inconsistent with the provisions of this Rule as appear to it to be necessary for removing the difficulty.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. JAYANT SARODE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ४५(३)] सोमवार, डिसेंबर १, २०२५/अग्रहायण १०, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर,२०२५.

### अधिसूचना

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता महाराष्ट्र राज्य इ-साक्ष व्यवस्थापन नियम, २०२५.**

क्रमांक बीएनएसएस/०३२५/प्र.क्र.३४/ विशेष-०९.– भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ ( २०२३ चा ४६ ) याच्या कलम ५३० द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :–

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.–**

( १ ) या नियमांस, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता महाराष्ट्र राज्य इ-साक्ष व्यवस्थापन नियम, २०२५ असे म्हणावे.

( २ ) ते, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या.-**

(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "सीसीटीएनएस" याचा अर्थ, माहिती (डेटा) संकलन व सूचनांच्या अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांद्वारे वापरले जाणारे गुन्हे व गुन्हेगार यांचा माग काढणारे जाळे (ट्रॅकिंग नेटवर्क) व प्रणाली, हे प्रणाली अनुदेशन (सिस्टम सॉफ्टवेअर), असा आहे;

(ख) "सीआयएस" याचा अर्थ, माहिती (डेटा) संकलन व सूचनांच्या अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा न्याय यंत्रणेद्वारे व उच्च न्यायालयांद्वारे वापरली जाणारी, प्रकरण माहिती प्रणाली (केस इन्फॉर्मेशन सिस्टम) हे, प्रणाली अनुदेशन (सिस्टम सॉफ्टवेअर), असा आहे;

(ग) "इ-स्वाक्षरी" याचा अर्थ, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) याच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या इलेक्ट्रॉनिक तंत्राच्या साहाय्याने अभिदात्याने किंवा न्यायालयाने केलेले कोणत्याही इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे अधिप्रमाणन, असा आहे आणि त्यात, डिजिटल स्वाक्षरीचा समाविष्ट होतो. तसेच, जेव्हा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तयार केलेली प्रक्रिया किंवा अहवाल, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीद्वारे अधिप्रमाणित केला जातो तेव्हा, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी उमटवणाऱ्या व्यक्तीच्या स्वाक्षरीद्वारे ते अधिप्रमाणित केल्याचे मानण्यात येईल;

(घ) "उच्च न्यायालय" याचा अर्थ, मुंबई येथील अधिकारितेचे उच्च न्यायालय,असा आहे;

(इ) "आयसीजेएस" याचा अर्थ, अंतर्गत वापरण्यायोग्य असलेली फौजदारी न्यायप्रणाली (इंटर-ऑपरेबल क्रिमिनल जस्टिस सिस्टम), असा असून हे अनुदेशन (सॉफ्टवेअर) सध्या फौजदारी न्यायव्यवस्थेच्या विविध स्तंभांमध्ये माहिती हस्तांतरित करण्यासाठी कार्यरत आहे, त्यामध्ये, अन्वेषण संस्था, न्यायालये, सुधार गृहे, न्यायवैद्यक प्रयोगशाळा, अभियोग व केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या इतर कोणत्याही हितसंबंधितांचा समावेश होतो;

(फ) "अन्वेषण अधिकारी" याचा अर्थ, सक्षम प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला किंवा कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करण्यासाठी अधिकार प्रदान केलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा इतर कोणताही व्यक्ती, असा आहे;

(छ) "साक्ष" याचा अर्थ, इ-साक्ष मोबाईल उपयोजकाद्वारे दस्तऐवज म्हणून गोळा केलेला/नोंदविलेला कोणताही पुरावा, असा आहे. साक्षीमध्ये, ध्वनिचित्र मुद्रण (व्हिडिओ रेकॉर्डिंग), छायाचित्र (छायाचित्रे), साक्षीदाराचे (साक्षीदारांचे) छायाचित्र (छायाचित्रे) आणि अन्वेषण अधिकाऱ्याचे/नोंदणी अधिकाऱ्याचे छायाचित्र असतात. इ-साक्ष मोबाईल उपयोजकाद्वारे नोंदविलेल्या सर्व पुराव्यांचे, घटनेचे एक सुरक्षित पाकीट (यात यापुढे ज्याचा निर्देश, "इ-साक्ष पाकीट पॅकेट" म्हणून संदर्भित) तयार करण्यात येईल, त्याचा, एसआयडी म्हणून संबोधला जाणारा एक अनन्यसाधारण आयडी, उघडण्याची व बंद होण्याची वेळ असलेला स्टॅम्प आणि भौगोलिक स्थान (जिओ लोकेशन) असलेला एक अनन्यसाधारण १६ अंकी आयडी (SID) असेल. त्याच्या प्रत्येक सामग्रीला, सचोटी राखण्याची सुनिश्चित करण्यासाठी अनन्यसाधारण हॅश मूल्य असेल, साक्ष, अपरिवर्तनीय संग्रहकामध्ये (स्टोरेजमध्ये) संग्रहित करण्यात येईल.

(ज) "संहिता" याचा अर्थ, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६), असा आहे;

(२) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व संज्ञा यांना, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६); भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५); भारतीय साक्ष अधिनियम, २०२३, (२०२३ चा ४७) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम,२००० (२००० चा २१) यांमध्ये जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

**३.** प्रत्येक अन्वेषण अधिकारी, संहितेच्या कलम १०५,१७३,१७६,१८०, १८५ व ४९७ अन्वये आवश्यक असलेले सर्व ध्वनिचित्र मुद्रण (व्हिडिओ रेकॉर्डिंग) व छायाचित्र पुरावे, इ-साक्ष मोबाईल उपयोजकाद्वारे नोंदवील.

**४.** अन्वेषण अधिकारी, इ-साक्ष मोबाईल उपयोजकाद्वारे भारतीय सक्षम अधिनियम, २०२३ (२०२३ चा ४७) याच्या कलम ६३ (४) (ग) खालील प्रमाणपत्र तयार करील. सर्व प्रमाणपत्रे इ-स्वाक्षरीकृत करण्यात येतील.

**५.** अन्वेषण अधिकारी, सीसीटीएनएसद्वारे तयार केलेल्या संबंधित एफआयआर क्रमांकाशी/जीडी क्रमांकाशी एसआयडी संलग्न करील.

**६.** अपरिवर्तनीय संग्रहकामध्ये (स्टोरेजमध्ये) साठवलेली (अपलोड) केलेली साक्ष, संहितेच्या कलम १०५ व १८५ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे दंडाधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आल्याचे समजण्यात येईल.

**७.** न्यायालये, सीआयएस अर्ज/साक्ष पोर्टल यामधील त्यांच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित सर्व साक्षी, आयसीजेएस (ICJS) वर पाहू शकतात व व्यवस्थापित करू शकतात.

**८.** न्यायालय, संहितेच्या कलम २३० खालील तरतुदींनुसार, आरोपीला व पीडित व्यक्तीला (जर वकिलामार्फत प्रतिनिधित्व केले असेल तर) साक्ष उपलब्ध करून देण्यास परवानगी देऊ शकते.

**९.** न्यायचौकशी पूर्ण झाल्यानंतर, इ-साक्ष पाकीट संग्रहित करण्यात येईल आणि ते संग्रहित मोडमध्ये हलवण्यात येईल.

**१०.** या नियमांमधील कोणतीही गोष्ट, न्यायालयाकडून साक्ष पाहण्याच्या न्यायालयांच्या अधिकारावर मर्यादा घालते असे मानण्यात येणार नाही.

**११.** हे नियम, भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ (२०२३ चा ४७) याच्या तरतुदींनुसार न्यायालयाकडून साक्ष स्वीकारण्यासाठी व व्यवस्थापित करण्यासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या किंवा नियमांच्या व्यतिरिक्त असतील, परंतु, ते, त्यांचे अल्पीकरण करणार नाहीत.

**१२.** जर या नियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, महाराष्ट्र शासन, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक असल्याचे दिसून येतील, त्याप्रमाणे या नियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. जयंत सरोदे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.